भारतीय विद्या भवनचे

# सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय

मुन्शी नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५८.

---

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान
## "छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यवस्थापन, व्यूहनीती आणि नेतृत्व"

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त, आपल्या महाविद्यालयाच्या प्रशिक्षण व आस्थापना विभागाने, **दि. २० फेब्रुवारी २०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता "छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यवस्थापन, व्यूहनीती आणि नेतृत्व"** या विषयावर, प्रसिध्द लेखक व वक्ते **डॉ. गिरीश दाबके** यांचे व्याख्यान आयोजित केलेले आहे.

डॉ. दाबके हे प्रसिध्द लेखक व वक्ते असून, त्यांची विविध विषयांवर पुस्तके प्रसिध्द झालेली आहेत. त्यांनी लिहिलेले श्री. धीरूभाई अंबानी व पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांचे चरित्र, मराठी, हिन्दी, गुजराती, उर्दू, इंग्रजी, तामिळ, इ. भाषांमध्ये भाषांतरीत झालेले आहे. डॉ. दाबके यांनी, श्री. वीर सावरकर, आर्य चाणक्य, छत्रपती शिवाजी महाराज, पेशव्यांचा इतिहास, बाजीराव पेशवे, नेताजी सुभाष चंद्र बोस या नेत्यांच्या कारकीर्दीवर प्रकाश टाकणारी, विविध सामाजिक व आर्थिक विषयांवर देशा-विदेशात सातशेहून अधिक व्याख्याने दिलेली आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज हे इ. स. १८१८ पर्यन्त टिकलेल्या आणि आपल्या परमोत्कर्षाच्या अवस्थेत भारतीय उपखंडाचा बराचसा भाग व्यापणाऱ्या मराठा साम्राज्याचे संस्थापक होते. शिस्तबद्ध लष्कर व सुघटित प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर शिवाजी महाराजांनी एक सामर्थ्यशाली आणि प्रागतिक राज्य उभे केले. भूगोल, आश्चर्यजनक वेगवान हालचाली आणि बलाढ्य शत्रूंचे मनोधैर्य खच्ची करणारे नेमके हल्ले यांचा वापर करणारे गनिमी काव्याचे तंत्र त्यांनी यशस्वीपणे वापरले. आपल्या वडिलांकडून मिळालेल्या २,००० सैनिकांच्या छोट्या तुकडीपासून एक लाख सैनिकांचे लष्कर महाराजांनी उभे केले. किनारी आणि अंतर्गत प्रदेशातील किल्ल्यांची डागडुजी करण्यासोबतच अनेक किल्लेही त्यांनी उभारले.

मला खात्री आहे की, या व्याख्यानाच्या निमित्ताने आपणा सर्वांना शिवाजी राजांच्या या अद्भुत कारकीर्दीचे स्मरण करण्याची संधी मिळेल. आपल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या व्याख्यानास आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन मी सर्वांना करतो. **[वेळ: दि. २० फेब्रुवारी २०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता, स्थळ: सेमिनार हॉल ११९]**

**प्राचार्य**

**दि.** ८ फेब्रुवारी २०१८